॥ विश्वाराध्य प्रसीदंतु ॥

# श्री १००८ जगद्गुरू विश्वाराध्य ज्ञानसिंहासन, जंगमवाडीमठ वाराणसी

लि.काशी जगद्गुरू
विश्वेश्वर शिवाचार्य महास्वामीजी

श्रीकाशी जगद्गुरू
डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

श्रीकाशी जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन
विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी

## डॉ. चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्कार,२०२२

**डॉ.वेदप्रकाश ईश्वरअप्पा डोणगावकर(मठवाले), वाशिम यांना**

साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल

श्रीकाशीपीठाच्या वतीने श्रीकाशीपीठाधिपती ज्ञानसिंहासनाधीश्वर

श्री १००८ जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते व

श्री १००८ जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी

श्रीक्षेत्र काशी यांच्या दिव्य सान्निध्यात आज दि.२७ जुलै २०२४ रोजी

हा पुरस्कार रोख रु. १०,०००/- स्मृतिचिन्हासह प्रदान करण्यात आला.

सोलापूर

श्रीजगद्गुरू चन्द्रशेखर शिवाचार्य

# श्रीजगद्गुरू विश्वाराध्य ज्ञानसिंहासन
# जंगमवाडी मठ, वाराणसी

दिनांक : ८/६/२०२४

मा. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
वाशिम

सविनय प्रणाम.

श्रीकाशीपीठ, जंगमवाडी हे काशी पुण्यक्षेत्रातील सर्वात प्राचीन ज्ञानपीठ आहे. या ज्ञानपीठाचे विद्यमान **जगद्गुरू श्री श्री श्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी** यांच्या आशीर्वादाने तसेच त्यांचे उत्तराधिकारी **श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी** यांच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक आणि सामाजिक कार्य सुरू आहेत. त्यांपैकी एक कार्य म्हणजे पुरस्कार होय. गेल्या अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने गौरविले आहे.

आपण साहित्य क्षेत्रात नावलौकिक संपादन केला असून साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी २०२२ यावर्षीचा **'डॉ. चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्कार'** आपणास देण्याचा प. पू. श्रीकाशी जगद्गुरू यांनी निर्णय घेतला आहे. दहा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शनिवार दि. २७ जुलै २०२४ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता, डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह सिद्धेश्वर मंदिराजवळ, सोलापूर येथे हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

यापूर्वी १. डॉ. रा. चिं. ढेरे, पुणे २. श्री शांतितीर्थ स्वामी, चाकूर ३. डॉ. यू. म. पठाण, संभाजीनगर ४. डॉ. सुधाकर मोगलेवार, नागपूर ५. डॉ. निर्मलकुमार फडकुले, सोलापूर ६. डॉ. इरेश स्वामी, सोलापूर ७. डॉ. शे. दे. पसारकर, सोलापूर ८. डॉ. अशोक कामत, पुणे ९. डॉ. भी. शि. स्वामी, औसा १०. डॉ. राम तोंडारे, उदगीर ११. डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, लातूर १२. डॉ. श्यामा घोणसे, पुणे १३. डॉ. शिवशंकर उपासे, आजरा, कोल्हापूर १४. वैजनाथ फास्के, लातूर १५. नारायण कुलकर्णी, सोलापूर १६. डॉ. शोभा कराळे, पंढरपूर १७. डॉ. अनिल सर्जे, सोलापूर १८. डॉ. संध्या तोडकर, नाशिक १९. दौलतप्पा शंकरप्पा साखरे, देगलूर, नांदेड २०.श्री. शिवलिंग बाबय्या स्वामी मानखेडकर, लातूर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या पुरस्कारासाठी संमती कळवून प्रसिद्धीसाठी आपला बायोडाटा आणि फोटो खालील ई-मेलवर पाठवावे ही विनंती.

आपला नम्र,

डॉ. अनिल काशीनाथ सर्जे
श्रीजगद्गुरू विश्वाराध्य ज्ञानसिंहासन, जंगमवाडी मठ, वाराणसी

पत्ता : बाबूराव मैंदर्गीकर, जयंती प्रिंटिंग प्रेस,
३७४, उत्तर कसवा, सोलापूर ४१३००७
दूरभाष : ९४०३२९२१११
Email : suvidyaprakashangmail.com